सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

विद्याविकास

स्वररंग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ. अभिजीत कुलकर्णी
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०२३-२४ /२४ दिनांक – ०८/०८/२०२३

प्रति ,
मा. प्राचार्य / मा. संचालक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

विषय : सांस्कृतिक समन्वयक नामनिर्देशनाबाबत.

महोदय/महोदया,

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार विद्यापीठामध्ये जी प्राधिकरणे अस्तित्वात आली आहेत त्यापैकी कलम २६ नुसार विद्यार्थी विकास मंडळ हे एक प्राधिकरण आहे. विद्यार्थी विकास मंडळ या प्राधिकरणाचे अधिकार व कर्तव्ये नव्या कायद्यात ५६ (१) नुसार नमूद केली आहेत. विद्यार्थी विकास मंडळाद्वारे महाविद्यालये, परिसंस्था व विद्यापीठ विभागांमधील विद्यार्थ्यांसाठी विविध सांस्कृतिक व कल्याणकारी कार्यक्रमांची आखणी आणि त्यांचे अन्वेक्षण करून विद्यार्थ्यांच्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमाच्या बाबतीत प्रादेशिक व राष्ट्रीय मंडळांशी दुवा साधणे, विद्यापीठस्तरीय स्पर्धा, कौशल्य विकास कार्यशाळा याबरोबरच प्रायोगिक कला व ललित कला क्षेत्राचे आकलन होण्यासाठी उपक्रम राबविणे, या आणि अशा प्रकारच्या विद्यार्थी सांस्कृतिक विकासाच्या रचनात्मक योजना व उपाययोजना राबवण्याबाबत निर्देशित केले आहे.

याकरिता आपल्या महाविद्यालय / परिसंस्थेतील सांस्कृतिक उपक्रमांचा अनुभव, आवड व या कार्यक्षेत्रात काम करण्याची इच्छा असणाऱ्या एका शिक्षकाचे सांस्कृतिक समन्वयक नामनिर्देशन करणे आवश्यक आहे. **सांस्कृतिक समन्वयक प्रस्ताव विद्यापीठ संकेतस्थळावर (www.unipune.ac.in – Students' Devlopment – BSD Online – College Login – For College Users – Login – Main Menu – Students Devlopment – सांस्कृतिक समन्वयक) येथे ऑनलाईन पद्धतीने भरावेत. या नंतर ऑनलाईन (Online) पद्धतीने भरलेल्या प्रस्तावाची प्रिंट काढून त्यावर मा. प्राचार्य / मा. संचालक यांची स्वाक्षरी घेऊन सदर स्वाक्षरी असलेले प्रस्ताव स्कॅन करून तिथेच शनिवार, दिनांक १२ ऑगस्ट, २०२३ पर्यंत अपलोड करण्याबाबत संबंधितांना सूचित करावे.** त्यानंतर आपल्या प्रस्तावावर या कार्यालयाकडून पुढील योग्य ती कार्यवाही करून ऑनलाईन संमती/मंजुरी देण्याची व्यवस्था केलेली आहे.

सदर प्रस्ताव भरताना खालीलप्रमाणे एक किंवा अधिक पर्यायाची निवड करणे अनिवार्य आहे.

१. विविध स्तरीय स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन / विभाग / तालुका / जिल्हा / विद्यापीठ संघाचे प्रतिनिधित्व, नेतृत्व व व्यवस्थापन.
२. सांस्कृतिक प्रशिक्षक म्हणून काम करणे.
३. सांस्कृतिक व्यवस्थापक म्हणून काम करणे.
४. सांस्कृतिक क्षेत्राचे प्रशिक्षण घेणे.
५. विभाग / जिल्हा सांस्कृतिक समन्वयक म्हणून काम करणे.

यानुसार प्रस्तुत पत्रासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्याबाबत आपण संबंधित विभागांना / शिक्षकांना अवश्य सूचित करावे.

**या पूर्वी ऑनलाईन अथवा इतर माध्यमातून सदर नामनिर्देशन आपल्यामार्फत केले गेले असले तरी वरील पर्यायासह नव्याने पुन्हा नामांकन करावे.** कळावे, ही विनंती.

(डॉ. अभिजित कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ